| आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई<br>(महाराष्ट्र राज्य)<br>"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई-०१ | |
|---|---|
| कार्यालय दूरध्वनी क्र.<br>२२६२१०३१-३६<br>फॅक्स क्रमांक २२६२२१५५ | क्रमवैआसे/२/अवैअ/समावेशन/९७-२००४/ कक्ष-२अ/०९<br>दिनांक २ जानेवारी ०९<br>Website :http://maha –arogya .gov.in |


प्रति,

उपसंचालक, आरोग्य सेवा,
परिमंडळ (सर्व)

विषयः- महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्यसेवा,गट-अ(वेतनश्रेणी रु.८०००-१३५००) अस्थाई नियुक्तीवरील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे समावेशन करण्याबाबत....

संदर्भः- या संचालनालयाचे समक्रमाकांचे दि.७.११.०८व २५.११.०८ चे उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रे पहावीत.

सदर पत्रान्वये महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रु. ८०००-१३५००) संवर्गातील ज्या वैद्यकीय अधिका-यांची अस्थायी नियुक्ती दि.३१.१२.०४ पर्यंत होऊन कार्यरत असलेल्या १२१६ वैद्यकीय अधिकाऱ्यांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध करुन त्या संदर्भात सुचना, त्रुटी, आक्षेप असल्यास तसे आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करण्याबाबत आपणासं कळविण्यांत आले होते. त्यास अनुसरुन ब-याचशा वैद्यकीय अधिका-यासंदर्भात त्रूटी तसेच त्याबाबत नवीन प्रस्तावहि आपणाकडून प्राप्त झाले आहेत.

याप्रकरणी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन त्यामध्ये नविन वैद्यकिय अधिका-यांचा समावेश करुन व त्रुटींची पूर्तता करुन सुधारित यादी संचालनालयाच्या वेबसाईटवर Website :http://maha –arogya .gov.in प्रसिध्द करण्यांत येत आहे तरी सदर यादीतील अस्थाई वैद्यकीय अधिका-यांना याबाबत तात्काळ अवगत करावे. जर काही सुचना/त्रुटी /आक्षेप असल्यास आपण आपल्यामार्फत आवश्यक त्या कागदपत्रासंह १५ दिवसांचे आत या संचालनालयास कळविण्यांत करावे. यासंदर्भात सुचना/त्रुटी /आक्षेप याबाबत वेळीच न कळविल्यास आपणांस काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरुन अंतिम निर्णय घेण्यात येईल. त्यानंतर येणा-या अर्जाची अथवा त्रुटींची नोंद घेण्यांत येणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**सहसंचालक, आरोग्य सेवा,**

**(अ व प्र) मुंबई**

प्रत कार्यवाहीसाठी अग्रेषितः- मा. संचालक आरोग्य सेवा (संचालक कक्ष)मुंबई आपणास विनंती करण्यात येते की, वरीलप्रमाणे उल्लेखित यादीची प्रत व पेन ड्राइव्ह मधील प्रारुप यादी प्रसिध्दीसाठी सोबत जोडण्यात येत आहे.सदर परिपत्रक व यादी संचालनालयाच्या संकेतस्थळी प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही यथाशिघ्र करण्यात यावी.